**नियमित दिवाणी दावा क्र. ८७/२०१८ मधील**

**नि.८४ वरील आदेश**

(आदेश पारीत दिनांक २६/०९/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.४० यांचे वारसांना अभिलेखावर दाखल करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनांप्रमाणे प्रस्तुत दाव्यात मयत दिपाली दिलीप खानोलकर हिचे वारसांना पक्षकार करताना केवळ तिच्या एका वारसांना म्हणजेच प्रतिवादी क्र.४० राजन दिलीप खानोलकर यांना पक्षकार करण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.४० यांची बहीण व भाऊ यांना नजरचुकीने पक्षकार करावयाचे राहून गेले आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.४० यांचे वारसांना प्रतिवादी क्र.४२ व ४३ म्हणून सामील करुन तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केलेली आहे.

०२. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र.११ ते १४ यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून मान्य व कबूल नाही. वादी कथन करीत असलेप्रमाणे दिपाली दिलीप खानोलकर ही वादी क्र.१ ते ४ यांची सख्खी बहीण असून तिच्या वारसांची नांवे नजरचुकीने दाव्यात नमूद करावयाची राहून गेली असे जे वादी नमूद करतात ते संयुक्तीक कारण नाही. प्रस्तुतचा दावा सन २०१८ मध्ये दाखल असून सुमारे ६ वर्षांच्या कालावधीनंतर वादी पक्षकार समाविष्ट करीत आहेत. वादीच्या अर्जातील परिच्छेद क्र.४ मधील मजकूर संदिग्ध स्वरुपाचा असून तशी दुरुस्ती करण्यास परवानगी देता येणारी नाही. वादी यांनी न्यायालयाचा बहुमूल्य असा वेळ वाया घालवलेला असून वादीस दावा चालविणेची स्वारस्य दिसून येत नसलेने अर्ज नामंजूर करणेची तसेच वादीस रक्कम रु. १०,०००/- इतका खर्च आकारणेची विनंती केलेली आहे.

०३. अभिलेख, अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. वादीच्या कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.४० यांचे वारसांना प्रस्तुत दाव्याचे कामी समाविष्ट करणे नजरचुकीने राहून गेले आहे.

प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे अर्ज चालणेस पात्र नाही. सदर दुरुस्तीही तांत्रीक स्वरुपाची आाहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. वादी यांनी प्रस्तुतचा दावा सरस निरस धडेवाटप व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. दाव्यातील दुरुस्ती मंजूर केलेस उभय पक्षकारांमधील वादाचा अंतिमरित्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे आणि त्यामुळे दाव्याचे स्वरूप बदलत नाही असे माझे मत आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. वादीचा निशाणी क्र.८४ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.10.01 17:03:33 +0530

दिनांक- २६/०९/२०२४ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),

सावंतवाडी.